# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. २०४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०३/२०१७

**१) मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

मार्च २०१६ ते नोव्हेबर २०१६ पर्यत. यातील फिर्यादी पिडीत मुलगी वय १८ वर्ष, रा. घानोळ हिला आरोपीने लग्नाचे आमीष दाखवुन तिचेवर वारंवार शारीरीक अत्याचार करुन पिडीत मुलीला गर्भधारणा झाल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७६(२)एन भादंवि. सहकलम लैगिक अत्याचारापासुन बालकाचे संरक्षण अधिनीयम २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाईले पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**२) विवाहीतेवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/११/२०१६ चे १०.३० ते २६/११/२०१६ चे ०६.०० वा. पर्यत. यातील फिर्यादी ही साकोली बसस्टॅन्डचे गेट जवळ उभी असतांना यातील आरोपीने तिचेजवळ मोटार सायकलने जावुन तुझ्या वडीलांचे गावी पोहचवुन देतो असे म्हणुन फिर्यादीस मोटर सायकलवर बसवुन जमनापुर जंगल शिवारात नेवुन जबरी अत्याचार करुन पुन्हा देवरी येथील लॉजवर नेवुन संभोग केले व फिर्यादीला कोणालाही काहीही सांगीतले तर जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. वानखेडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल चालकाने उभ्या ट्रॅक्टर टॉली धडक देुवन दोघांचा मृत्यु . :–**

दिनांक २१/०३/२०१७चे १८.३० ते १८.४५ वा. दरम्यान. यातील फिर्यादी मंगेश्वर जगदीश वाढई वय २८ वर्ष, रा. भिलेवाडा यांचा काका मृतक नरहरी बयाजी वाढई वय ५५ वर्ष, रा. भिलेवाडा हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ पी ७६४८ ने मृतक प्रवीण पचारे रा. भिलेवाडा यांचे सोबत आकोट वरुन गावाला परत जात असतांनी पागोरा येथे डांबरी रोडवर यातील आरोपीने आपले नादुरुस्त ट्रॅक्टर टॉली ही कोणत्याच प्रकारची खुन इंडीकेटर किंवा दिशादर्शक चिन्ह न करता धोकादायक स्थितीत उभी करुन ठेवल्याने मृतक यांना न दिसल्याने मृतकाची मोटार सायकल यांना न दिसल्याने मृतकाची मोटार सायकल उभी असलेल्या ट्रॅक्टर टॉलीला धडक लागल्याने दोन्ही व्यक्ती अपघातात गंभिर रित्या जखमी होवुन मरण पावल्याने पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३०४(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डोंगरे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल निष्काळजीपणे चालवुन बैल बंडीस धडक देवुन स्वत:चे मरणास व एकास महिलेस गंभीर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २०/०३/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी जागेश्वर बकाराम मेहंदडे वय ४५ वर्ष, रा. गांधी चौक लाखांदुर हे स्वत:चे बैल बंडी मध्ये लोखंडी सलाख व सिमेंट मध्ये स्वत:चे घराकडे जात असता यातील मृतक आरोपीने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व लापरवाहीने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे बैल बंडीला धडक देवुन अपघात केल्याने स्वत:चे मरणास व मागी बसलेली मिरा सुधाकर भर्रे वय ३८ वर्ष, रा. कन्हाळगाव हिला गंभीर जखमी करण्यास व फिर्यादीचे बैल बंडीस जुंपलेल्या बैलांना दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३०४(अ),२७९,३३८,४२७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निबेंकर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**५) गाईच्या वासराला काठीने मारुन जखमी करुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/०३/२०१७ चे ९.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी उमेश रामदास अंडेल वय ३० वर्ष, रा. मांढळ याचा लाल रंगाचा २.५ महीण्याचा गाईचा वासरु आरोपीचे शेतात गेला असतांना त्याने वासराचे मागील बाजुचे उजेव पायाला काठीने मारुन जखमी केले व अंदाजे १०,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४२९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. वलके पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**६) शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २०/०३/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी हे आपल्या शासकीय कार्यालयात कायदेशीर रित्या सरकारी कर्तव्य बजावीत असतांना यातील आरोपी श्रीमती–मडावी मुख्याधीकारी नगर परीषद पवनी यांनी त्यांचे स्टॉफसह कुठल्याच प्रकारची पुर्व सुचना न देता फिर्यादी यांचे कार्यलयात येवुन सदर कार्यालय का. व. सु. राखण्याचे दुष्टीकोनातुन चोवीस तास सुरु राहणे आवश्यक असल्याची पुर्व जाणीव असतांना देखील आरोपी यांनी फिर्यादीस त्यांचे कर्तव्य बजावत असतांनी त्यांना प्रतीबंधक करण्याचे उद्देशाने शासकीय कामात अडथळा आणुन त्याचे कार्यालयाचे महत्वाचे कक्ष सिलबंद करुन फिर्यादी तसेच त्याचे स्टॉपला दैनदीनी कामकाज करण्यास प्रतीबंधक करुन प्ररावृत्त केल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. गदादे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३४१,३५३भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपेनि. चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**७) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन लज्जास्पंद बोलुन भांडण, शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २०/०३/२०१७ चे २०.१५ वा. दरम्यान. यातील फिर्यादी व आरोपी यांच्यात घराचे जाण्या येण्याचे रस्त्यावरुन आपसात वाद असुन यातील फिर्यादी ही आपले घरी परीवारासह हजर असतांना यातील तीन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे घरा समोरील रोडवर येवुन आमची रिपोर्ट का केल्या असे बोलुन लज्जास्पंद शब्द बोलुन अपमानीत करुन शिवीगाळ करुन जिवाने मारण्या पीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ५०९,५०४,५०६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोलंकी पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**८) अवैध दारु/ जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक २१/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. पालांदुर, लाखांदुर व अडयाळ येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ०५ लिटर ५८० मिली देशी किंमती १५५०/–रु. तसेच जुगारातुन ३१०/–रु. असा एकुण किंमती १,८६०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोउपनि.ए.व्ही. तुळजेवार
नियंत्रण कक्ष अधिकारी भंडारा
दुरध्वनी.क्र. ७७६८८६९९७७

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.